ePaper

## तुमच्या नाकाखालून सरकार घेऊन गेलो!: देवेंद्र फडणवीस



| वर्ष - 6 | अंक - 244 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार | दिनांक 18 डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- पवनाथडी जत्रा सारख्या उपक्रमातून कुटुंबं उभी राहतील
- मविआचा एल्गार...
- जीएसटी कौन्सिलचा मोठा निर्णय !

# पालकमंत्र्यांना शाईफेकीचा धसका?

## चंद्रकांत पाटील यांच्या बचावासाठी फेसशिल्डचा वापर, सोशल मीडियावर फेसशिल्ड चर्चेचा विषय

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिराव फुले आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांनी भीक मागून शाळा सुरु केल्या, असं वादग्रस्त वक्तव्य मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलं होतं. यानंतर त्यांच्यावर समता सैनिक दलाच्या कार्यकर्त्यांकडून शाईफेक करण्यात आली. या शाईफेकीचा चंद्रकांत पाटील यांनी चांगलाच धसका घेतलेला दिसत आहे. आपल्यावर परत शाईफेक झाल्यास डोळ्यास इजा होऊ नये, याची खबरदारी पाटील यांनी घेतली आहे.



चंद्रकांत पाटील आज सांगवी येथे सुरू असलेल्या पवनाथडी जत्रेला भेट देण्यासाठी आले होते. यावेळेस त्यांनी लावलेल्या फेसशिल्डने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. पाटलांनी चक्क फेसशिल्ड लावले होते. आपल्यावर पुन्हा शाईफेक झाल्यास कोणतीही गंभीर इजा होऊ नये, यासाठी पाटलांनी ही खबरदारी घेतली आहे. कोरोना काळात भाजप नेते किरीट सोमय्या यांनीही अशाच प्रकारचा फेसशिल्डचा वापर केला होता. दरम्यान पाटलांचा फेसशिल्ड हा सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे.

...

पालकमंत्री चंद्रकांत पाटील हे पिंपरी-चिंचवडमध्ये येणार असून त्यापूर्वी त्यांना धमकी वजा इशारा देण्यात आला आहे. आज त्यांच्यावर पुन्हा शाईची मुक्त उधळण होणार? मु.पो.सांगवी, पत्रकार मित्रांनो आज पण चांगला अँगल घ्या, चंपाच तोंड काळे करा रे, असा धमकी वजा इशारा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना देण्यात आला आहे. याबाबत भाजपचे माजी नगरसेवक हर्षल ढोरे यांनी सांगवी पोलिसात तक्रार दिली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. द्वेष भावना पसरविणे आणि धमकी देणे याबद्दल १५२, ५०५ कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राष्ट्रवादीचे सोशल मीडिया अध्यक्ष विकास लोले, दशरथ बाबुराव पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित मजकूर असलेली पोष्ट सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आली आहे. फेसबुकवर पोस्ट करून आणि व्हाट्सऍप स्टेट्स ठेवून समाजात तेढ निर्माण केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आज पालकमंत्री चंद्रकांत पाटील हे पवनाथडी येथे यात्रेसाठी येणार आहेत. हे पाहता धमकी देण्यात आली आहे. यामुळे पवनाथडी यात्रेच्या ठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# 'सर्जिकल स्ट्राईक'मुळे पाकिस्तानी नेत्यांचा जळपळाट : आमदार महेश लांडगे

## पाकिस्तानी विदेश मंत्री बिलावल भुट्टो याचा निषेध

### पिंपरी-चिंचवड भाजपाकडून पाकिस्तानच्या झेंड्याचे दहन

पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांना चोख प्रत्त्यूत्तर देत 'सर्जिकल स्ट्राईक' केला होता. त्यावेळी पाकड्यांच्या लक्षात आले की, हिंदूस्थान केवळ चर्चा-समझोत्याच्या भाषेत नाही. तर आपल्या कृतीला जशाश तसे उत्तर देत आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या काही नेत्यांचा जळपळाट आजुनही सुरू आहे. पंतप्रधान मोदी यांना खालच्या भाषेत बोलत आहेत. हा केवळ पंतप्रधानांचा नव्हे, तर तमाम भारतीयांचा अवमान आहे, अशी टीका भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत पाकिस्तानचे विदेश मंत्री बिलावल भुट्टो याने आक्षेपार्ह आणि बदनामीकारक वक्तव्य केले. याच्या निषेधार्थ पिंपरी-चिंचवड भाजपातर्फे मोरवाडी येथे तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी पाकिस्तानच्या झेंड्याचे दहन करण्यात आले. आंदोलनाला विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, माजी महापौर उषा उर्फ़ माई ढोरे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, सरचिटणीस राजू दुर्गे, मोरेश्वर शेडगे, प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार, प्रदेश चिटणीस अमित गोरखे, युवा मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस अनुप मोरे यांच्यासह, माजी नगरसेवक कुंदन गायकवाड,राजेंद्र लांडगे, अनुराधा गोरखे,कमल घोलप, शर्मिला बाबर, महिला अध्यक्ष उज्वला गावडे, युवा अध्यक्ष संकेत चोंधे, अजित कुलथे, समीर जवळकर, नंदू कदम,शेखर चिंचवडे, प्रकाश जवळकर, सुप्रिया चांदगुडे,जयश्री वाघमारे, गणेश ढाकणे,निखिल काळकुटे, वैशाली खाड्ये, आशा काळे, सोनम जांभुळकर, कमलेश भरवाल, संजय मंगोडेकर, मुकेश चुडासमा, देवदत्त लांडे, दिनेश यादव, सागर हिंगणे, जयदेव डेम्ब्रा, संदीप नखाते, शिवदास हांडे,अमित गुप्ता, मंगेश धाडगे, निलेश अष्टेकर, शिवराज लांडगे, सचिन राऊत, विक्रांत गंगावणे, दीपाली कारंजकर, संजय परळीकर आदी उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, देशाच्या पंतप्रधानांचा आदर प्रत्येकाच्या मनात आहे. मात्र, पाकिस्तानी नेत्यांना भारताच्या पंतप्रधानांबाबत आकस वाटतो. जगभरात नरेंद्र मोदी यांची लोकप्रियता वाढत आहे. मोदींच्या नेतृत्वात भारत महासत्तेच्या दिशेने वाटचाल करीत आहे. त्यामुळे पाकिस्तानी नेत्यांचा जळपळाट झाला आहे.

### पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा...

शिंदे-फडणवीस सरकारची सत्ता राज्यात आल्यापासून भाजपाविरोधी पक्षांनी आंदोलने आणि मोर्चे काढून विरोधी वातावरण निर्माण करण्याची रणनिती आखली आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून भाजपानेही आक्रमक भूमिका घेत. विविध मुद्यांवर आक्रमक आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. राज्याचे उच्च शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या शाईफेक प्रकरणानंतर भाजपाने आंदोलन केले होते. त्यानंतर पंतप्रधान मोदींच्या अवमान प्रकरणी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला सर्व पदाधिकारी आणि माजी नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित राहीले. या आंदोलनात पाकिस्तान मुर्दाबाद, पाकिस्तान माफी मांगो अशा जोरदार घोषणांनी भाजपा कार्यकर्त्यांनी परिसर दणाणून सोडला.



# पुणे शहरात आठवड्यापासून उकाडाच

## ऐन थंडीत कमाल, किमान तापमान सरासरीपुढे

**जुनी सांगवी : ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

पुणे शहर आणि परिसरात गेल्या आठवड्यापासून ऐन थंडीच्या हंगामातील डिसेंबरमध्ये उकाड्याची स्थिती कायम आहे. हळूहळू शहरातील अंशत: ढगाळ स्थिती निवळत असताना पुढील दोन-तीन दिवसांत तापमानात काही प्रमाणात घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे काही प्रमाणात गारवा निर्माण होऊ शकतो.

बंगालच्या उपसागरातील चक्रीवादळ आणि अरबी समुद्रातील कमी दाबाच्या पट्ट्याचा परिणाम एकूणच महाराष्ट्रातील थंडीवर झाला. रात्रीचे किमान तापमान सरासरीखाली आवश्यक असताना सातत्याने सरासरीपार जात आहे. त्यामुळे थंडीच्या हंगामात उकाड्याची स्थिती जाणवत आहे. पुणे शहर आणि परिसरातही डिसेंबरमध्ये तापमानात मोठ्या प्रमाणात चढ-उतार दिसून आले. ९ आणि १० डिसेंबरला शहर आणि परिसरात कोरड्या हवामानाची स्थिती होती. त्याच वेळेला उत्तरेकडून थंड वाऱ्यांचा प्रभाव वाढला होता. त्यामुळे या दोन दिवसांत शहरातील रात्रीच्या तापमानात सरासरीच्या तुलनेत ५ ते ७ अंशांनी घट होऊन ते ८ ते ९ अंशांपर्यंत खाली आले होते. त्यानंतर मात्र चक्रीवादळाच्या प्रभावामुळे ढगाळ स्थिती निर्माण होऊन तापमानात सातत्याने वाढ होऊन ते सरासरीच्या तुलनेत ५ ते ७ अंशांनी वाढले. किमान तापमान १० किंवा १२ अंशांच्या आसपास राहण्याऐवजी ते २० ते २२ अंशांपर्यंत वाढले. त्यामुळे हवेतील गारवा पूर्णत: नाहिसा झाला.

### तापमान घटण्याची शक्यता

पुणे शहर आणि परिसरात अद्यापही काही प्रमाणात संध्याकाळनंतर आकाश ढगाळ होत आहे. अरबी समुद्रातून येणाऱ्या बाष्पाचा हा परिणाम आहे. मात्र, पुढील दोन ते तीन दिवसांत आकाश निरभ्र राहण्याची शक्यता आहे. याच काळामध्ये उत्तरेकडील काही राज्यांमध्ये थंडीच्या लाटेची स्थिती तयार होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे शहरातील रात्रीच्या किमान तापमानात दोन-तीन दिवसांच्या कालावधीत २ ते ४ अंशांनी घट होण्याची शक्यता आहे. परिणामी रात्री काही प्रमाणात गारवा अवतरणार आहे.



सध्या शहरात दिवसाचे कमाल आणि रात्रीच्या किमान तापमानातील वाढ कायम आहे. दोन्ही वेळेचे तापमान सरासरीच्या तुलनेत वाढलेले आहे. त्यामुळे रात्री काहीसा उकाडा आणि दिवसा उन्हाचा हलका चटका जाणवतो आहे. शनिवारी (१७ डिसेंबर) शहरात १७.१ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. हे तापमान सरासरीच्या तुलनेत तब्बल ६.१ अंशांनी अधिक होते. दिवसाचे कमाल तापमान ३१.७ अंशांवर होते. तेही सरासरीच्या तुलनेत २.६ अंशांनी अधिक होते.

---

# सारसबाग चौपाटीच्या पुनर्विकासासाठी
# साडे पाच कोटींचा प्रस्ताव

**।पुणे । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

महापालिकेतर्फे सारसबाग चौपाटी येथे वॉकिंग प्लाझा विकसित करण्यात येणार आहे. तेथील खाद्यपदार्थांच्या व्यावसायिकांनी अटीशर्तीवर स्टॉल लावून व्यवसायास परवानगी देण्यात येणार आहे. याचा आराखडा महापालिकेने तयार करण्यात आले असून, याकामासाठी सुमारे ५ कोटी ४० लाख रुपयांचा खर्च येणार आहे. महापालिकेने सारसबाग चौपाटीवर अतिक्रमण कारवाई करून वाढीव क्षेत्र वापरल्याने ५२ स्टॉल सील केले होते. तेथील शेड, टेबल, खुर्च्या जप्त केल्या. व्यावसायिकांना वारंवार सूचना देऊनही नियमांचे पालन होत नसल्याने महापालिकेने ही कारवाई केली होती. अनेक दिवस स्टॉल बंद असल्याने व्यावसायिकांनी यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी आयुक्तांकडे केली होती.



यावर आयुक्तांनी अधिकाऱ्यांची बैठक घेत सारसबाग चौपाटी येथे अतिक्रमण होऊ नये, नागरिकांना त्रास होऊ नये याद्दष्टीने उपाय योजना करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार चौपाटीचे सुशोभीकरण, स्टॉलची एक सारखी पण आकर्षक अशी रचना, नागरिकांना चालण्यासह बसण्यासाठी खास जागा असा वॉकिंग प्लाझाचे नियोजन करण्यात आले. वॉकिंग प्लाझा' झाल्यानंतर चौपाटी परिसरात दुचाकी आणि चारचाकी वाहनांना पेशवे उद्यानाजवळ असलेल्या वाहनतळापर्यंतच आपली वाहने नेता येणार आहे. व्यावसायिकांना खुर्च्या आणि समोरील बाजूस छत लावण्यासाठी ठराविक जागा निश्चित करून दिली जाणार आहे.

## आळेफाटा बाजारात कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक

**।आळेफाटा। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

येथील उपबाजारात शुक्रवारी १८ हजार ५५१ कांदा पिशव्यांची आवक होऊन प्रतवारी एक नंबर कांद्यास दहा किलोला १७५ रुपये बाजारभाव मिळाला. जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आळेफाटा या ठिकाणी शुक्रवारी (ता. १६) झालेल्या मोढ्यांत एक नंबर गोळा कांद्यास दहा किलोस १४०ते १७५ रुपये, दोन नंबर कांद्यास ११० ते १४५ रुपये, हलका कांद्यास दहा किलोस ८० ते १२० रुपये, तीन नंबर ५० ते ११० रुपये बाजारभाव मिळाला. गोल्टी कांद्यास दहा किलोस ३० ते ६० रुपये बाजारभाव मिळाला आहे. व बदला चिंगळी कांद्यास दहा किलोस १० ते ८० रुपये बाजारभाव मिळाला आहे.



---

# पुणे जिल्ह्यातील २२१ ग्रामपंचायतींसाठी मतदान

## सरपंचपदासाठी 519, सदस्यपदासाठी 3013 उमेदवार

**पुणे । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

जिल्ह्यात नव्याने स्थापित आणि मुदत संपणाऱ्या २२१ ग्रामपंचायतींची निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. या ग्रामपंचायतींसाठी रविवारी (१८ डिसेंबर) सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत मतदान होणार आहे. या



ग्रामपंचायतींमध्ये सरपंच पदासाठी १६७ जागांवर ५१९ उमेदवार, तर १०६२ सदस्यपदांसाठी ३०१३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. जिल्ह्यातील १३ पैकी ११ तालुक्यांतील ग्रामपंचायतींचा निवडणुकीमध्ये समावेश आहे. उमेदवारी अर्ज माघारीनंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले. २२१ ग्रामपंचायतींपैकी २७ ग्रामपंचायतींमधील सदस्य बिनविरोध झाले आहेत. तसेच या निवडणुकीत सरपंचाची निवड थेट केली जात असून ४५ ग्रामपंचायतीचे सरपंच बिनविरोध झाले आहेत. त्यामुळे आता सरपंचपदाच्या १६७ जागांसाठी मतदान होणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील ग्रामपंचायत शाखेने दिलेल्या माहितीनुसार सदस्य पदांच्या १०६२ जागांसाठी मतदान होत असून त्यासाठी ३०१३ उमेदवार रिंगणात आहेत. रविवारी सकाळी साडेसात ते साडेपाच या वेळेत मतदान होणार आहे, मतमोजणी २० डिसेंबर रोजी तालुक्याच्या ठिकाणी होणार आहे, तर निकालाची अधिसूचना २३ डिसेंबर रोजी तहसीलदार प्रसिद्ध करणार आहेत.

# पवनाथडी जत्रेला प्रारंभ!

## जत्रेत महिलांना सक्षमीकरणासाठी उत्तम व्यासपीठ उपलब्ध

**पिंपरी-चिंचवड । ।महाईन्यूज ।**

महापालिकेच्यावतीने महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी पवनाथडी जत्रेच्या माध्यमातून महिलांना उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येत आहे. महिलांना खऱ्या अर्थाने प्रोत्साहन देण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून संधी उपलब्ध व्हावी यासाठी महापालिका नेहमीच प्रयत्नशील असते, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांनी केले. महानगरपालिकेच्यावतीने महिला बचत गटाने उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी सांगवी येथील पी.डब्ल्यू.डी.मैदानावर 16 ते 20 डिसेंबर 2022 या कालावधीत पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या पवनाथडी जत्रेचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त जांभळे यांच्या हस्ते पार पडले

या कार्यक्रमास भाजपच्या महिला मोर्चा प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ, अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, सहआयुक्त आशादेवी दुरगुडे, उपआयुक्त चंद्रकांत इंदलकर, सहायक आयुक्त श्रीनिवास दांगट, रविकिरण घोडके, विजयकुमार थोरात, समाज विकास अधिकारी सुहास बहाद्दरपुरे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य सुरक्षा अधिकारी मेजर उदय जरांडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, माजी महापौर उषा ढोरे, माजी पक्षनेते नामदेव ढाके, माजी नगरसेवक शंकर जगताप, माजी स्थायी समिती सभापती राजेंद्र राजापुरे, प्रशांत शितोळे, माजी प्रभाग अध्यक्ष सुरेश भोईर, सागर आंगोळकर, बाबासाहेब त्रिभुवन, अंबरनाथ कांबळे, हर्षल ढोरे, माजी नगरसेविका माधवी राजापुरे, शारदा सोनवणे, जैवविविधता व्यवस्थापन समितीच्या माजी सभापती उषा मुंढे, सामाजिक कार्यकर्त्या उज्वला गावडे, रंजना चिंचवडे, उषाताई भिसे, कार्यकारी अभियंता अनिल शिंदे, दिलीप धुमाळ यांच्यासह महापालिका कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे म्हणाले, महापालिकेच्या वतीने वेगवेगळ्या माध्यमातून महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहून त्यांचे आर्थिक, मानसिक आणि सामाजिक सक्षमीकरण व्हावे यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. पवनाथडी जत्रेच्या माध्यमातून महिला बचत गटाने उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी हे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच यापुढेही महिलांना अशा प्रकारचे व्यासपीठ मिळावे यासाठी महापालिका प्रयत्नशील राहील.



> **शहराचा विकास साधत असताना महापालिकेच्या वतीने शहरातील महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी महापालिकेच्या वतीने सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहून आर्थिक सक्षमीकरणासाठी या माध्यमातून मदत होत आहे. माजी पक्षनेते नामदेव ढाके म्हणाले, महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येतात. लाईटहाउस या उपक्रमाच्या माध्यमातून महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी प्रयत्न केले जात आहेत.**
>
> **-उषा माई ढोरे,** माजी महापौर



### अतिशय स्तुत्य आणि कौतुकास्पद बाब

उद्घाटनप्रसंगी उपस्थित असलेल्या चित्रा वाघ यांनी आपले मत यावेळी मांडले. चूल व मूल या संकल्पनेच्या पलीकडे जाऊन स्त्रियांमधील कलागुणांना वाव देण्यासाठी महापालिकेच्या वतीने पवनाथडीच्या निमित्ताने उत्तम संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. ही अतिशय स्तुत्य आणि कौतुकास्पद बाब आहे. त्यासोबतच महाराष्ट्राची परंपरा आणि संस्कृती जपण्याचे महत्त्वपूर्ण काम या माध्यमातून होत असल्याबद्दल वाघ यांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपआयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी, सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले. तर आभार सुहास बहाद्दरपुरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

---

# हिंदू जनगर्जना मोर्चेमुळे रविवारी पिंपरी-चिंचवड शहरात वाहतुकीत बदल

## मोर्चामुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात गर्दी होऊन वाहतूक कोंडी होण्याची शक्यता

**।पिंपरी-चिंचवड । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

हिंदू जनगर्जना मोर्चेमुळे रविवारी पिंपरी-चिंचवड शहरात वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत.सकाळी 9 ते 11 वाजेपर्यंत विविध मागण्यांसाठी हिंदू जनगर्जनेतर्फ मोर्चा काढण्यात येणार आहे.या मोर्चामुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात गर्दी होऊन वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे.त्यामुळे या मार्गावरील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत.



सकल हिंदू समाज समन्वय समिती पिंपरी-चिंचवड यांच्या वतीने रविवार 18 डिसेंबर 2022 रोजी सकाळी 9 ते 11 वा. दरम्यान विविध मागण्यांसाठी हिंदू जनगर्जनातर्फ मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हा मोर्चा क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे स्मारक, चिंचवड स्टेशन, महावीर चौक, (PIMPRI NEWS) चिंचवड ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक, पिंपरी चौक दरम्यान निघणार असल्याने या मार्गावर मोठ्या प्रमाणात गर्दी होऊन वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक सुरळीत राहण्याकरिता मोर्चाच्या मार्गावरील वाहतूक अन्य मार्गाने वळवण्यात आली आहे. त्यामुळे विवेक पाटील पिंपरी-चिंचवड शहर अतिरिक्त कार्यभार वाहतूक शाखा पोलीस उप आयुक्त परिमंडळ 1, यांनी पिंपरी व चिंचवड वाहतूक विभागाअंतर्गत तात्पुरत्या स्वरूपात वाहतुकीत बदल करण्याचे आदेश दिले आहेत.

### पिंपरी व चिंचवड वाहतूक विभागा अंतर्गत वाहतुकीत बदल

1) महावीर चौक चिंचवड कडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी कडे सर्व्हिस रोडने येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत असून सदरची वाहने डी मार्ट इन जवळील ईन मधून ग्रेड सेपरेटर मधून इच्छित स्थळी जातील.

2) नाशिक फाट्याकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी कडे सर्व्हिस रोडने येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत असून ही वाहने डेअरी फार्म ग्रेड सेपरेटर इन व एचपी पंप खरळवाडी रेड सेपरेटर इन मध्ये प्रवेश करून इच्छित स्थळी जातील.

3) स्व. इंदिरा गांधी पुल ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी कडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत असून ही वाहने मोरवाडी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

4) नेहरूनगर चौकाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी कडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत असून ही वाहने एच. ए. कॉर्नर बस स्टॉप येथून रस रंग चौक- ऑटो क्लस्टर कडे वळून इच्छित स्थळी जातील.

5) केएसबी चौक व बसवेश्वर चौकाकडून महावीर चौकात येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत असून ही वाहने ऑटो क्लस्टर पासून मदर टेरेसा पुलावरून काळेवाडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

6) केएसबी चौक व सम्राट चौकाकडून पिंपरी चौकाकडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत असून ही वाहने अजमेरा कॉलनी- रसरंग चौक, नेहरूनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

7) भक्ती शक्ती, खंडोबा माळ चौकाकडून पिंपरी चौकाकडे जाणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत असून ही वाहने टायटन शोरूम/ चर्च समोरील ग्रेड सेपरेटर मधून इच्छित स्थळी जातील.

8) पिंपरी पोलीस ठाणे पाठीमागून महावीर चौक कडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

## संपादकीय »

# निषेध, मुर्दाबाद बस झाले लोकांच्या प्रश्नावर लढा !

***गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्रात जणू काही सगळे प्रश्न संपले आहेत ,लोकांना आता कशाचीही अडचण नाही,सगळे कसे आलबेल सुरु आहे. महागाई अर्ध्यावर आली,गॅस सिलिंडर स्वस्तात मिळायला लागला. शेतकऱ्यांना न मागता भरपाई मिळाली.***

विद्यार्थी,युवक,महिला,कामगार आणि गृहिणी कुणाचीही तक्रार राहिली नाही असे वातावरण निर्माण झाले आहे. कोश्यारी,चंद्रकांत पाटील आणि आता सुषमा अंधारे यांचे निषेध आणि मुर्दाबाद सर्वात महत्वाचे विषय बनले आहेत. गावोगाव सगळे विषय बाजूला सारून मोर्चे,निदर्शने आणि कुणाच्या तरी नावाने बोंबा मारणे सुरु झाले आहे. कधी शिवप्रेमी,कधी बहुजन समाज तर कधी वारकरी समुदायाला हाताशी धरून काल्पनिक प्रश्नांवर राज्याचे वातावरण गढूळ करण्याचे कार्यक्रम सुरु आहेत. दुर्दैवाने याला सत्ताधारी आणि विरोधी असे दोन्ही घटक जबाबदार असल्याचे जाणवत आहे.

मूळ प्रश्नांना बगल देऊन भलत्याच विषयावर लोकांचे लक्ष विचलीत करीत राजकारण करण्यात भाजप माहीर आहेच पण आता त्यांच्या पाठोपाठ दोन्ही काँग्रेसने जायला सुरुवात केली आहे. संख्या बळावर ढासळलेले सरकार आणि गेलेली खुर्ची ही जखम भळभळती ठेवत उद्धव ठाकरे गेली सहा महिने त्यातून बाहेर पडायला तयार नाहीत. सरकारवर त्याच गुळगुळीत झालेल्या शब्दांचे प्रहार करीत स्वतःचा पक्ष सावरताना लोकांशी काहीतरी बांधिलकी असते याचाच विसर पडला आहे असे जाणवत आहे. दुसऱ्या बाजूला भाजपच्या कडेवर जाऊन बसलेले एकनाथ शिंदे आणि त्यांचा गट आतल्या अस्थिरतेला लपवत मिळालेल्या संधीचा फायदा करून घेण्यात मग्न आहे. याकाळात अजूनही त्रस्त आहे तो राज्यातला सामान्य माणूस आणि शेतकरी. त्याला दिलासा देण्यासाठी व्यापक आणि कायमस्वरूपी उपाय काही शोधले जात नाहीत. वरवरच्या मलमपट्टीचे सगळे समर्थक झाल्याचे दिसत आहे.

मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे भलेही योग्य असतील परंतु भाजपच्या वळचणीला गेल्यावर हा माणूस स्वतंत्रपणे काम करतो आहे असे वाटणारे वातावरण अजूनही कुठेच जाणवत नसेल तर सामान्य माणसाला आगीतून निघून फुफाट्यात पडल्याचे नक्कीच जाणवत असेल ते काही खोटे नाही. राज्यात सर्वत्र निषेध,निदर्शने चालली असताना मराठी भाषा आणि सांस्कृतिक खात्याने नवाच घोळ करून वादाला तोंड फोडले आहे.



## आनंदी सकाळ

# 'चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन।

पवित्रता ज्या त्यागाहून सहनशीलतेतून प्रकट होते, हे सर्वशील-चारित्र्याचे मूलभूत गुण व देवतुल्य मनोवृत्ती आहेत. म्हणून भारतीय सौंदर्यबोधही अशा उच्च गुणांनी युक्त आहे. जे शीलवान आहे, ते सुंदर आहे; कारण ते निष्कलंक आहे, शुद्ध आहे. म्हणूनच ते मोहक व अनुपम आहे. नारी-नारायणी रूप नैतिक सौंदर्याचा समुच्चय आहे. मातृरूप, मातृभाव या सौंदर्याचा सर्वोत्तम अनुभव आहे. पुत्र हा कुपुत्र होऊ शकतो; परंतु माता ही कधीच कुमाता होत नाही, असा दृढ विश्वास 'आई' या दोन अक्षरांत आहे. नारदाने भक्तीच्या एकादश आसक्तीत वात्सल्याचा अंतर्भाव केला आहे. संतांनी ईश्वरास, सद्गुरूस माऊली भावाने हाक मारली. 'मातृदेवो भव' ही सार्वकालिक आस्था आहे. भारतीयांनी याच मनोभूमिकेत मातृभूमीस 'आई'च्या उदात्त भावनेने स्वीकारले; त्यामुळे भारतीय अध्यात्म हे सतत सर्वोदय व राष्ट्रोद्धाराशी एकरूप आहे. आत्मज्ञानाचा प्रकाश उजळण्याची व अज्ञान, भ्रममायेने प्रभावित अज्ञानाचा अंधार नाहीसा करण्याची सदिच्छा भारतीय साहित्यात नित्य व्यक्त झाली आहे. ज्ञानाची सुंदर पहाट होण्यासाठी भाव इच्छा, बुद्धी, विचार, आकांक्षा, श्रद्धा, कल्पना आदी शुद्ध विशाल, नि:स्वार्थी, पवित्र, समदर्शी असणे आवश्यक आहे.

# मागे बसणाऱ्याला हेल्मेटसक्ती योग्य की अयोग्य?






मुंबईच्या वाहतूक पोलिसांनी ९ जूनपासून दुचाकीवर मागे बसणाऱ्यांनाही हेल्मेट सक्तीचे केले आहे. यासोबतच नियम मोडणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशाराही वाहतूक पोलिसांनी दिलाय. विशेष म्हणजे तत्पूर्वी हा नियम लागू करण्यासाठी १५ दिवसांची मुदतही दिली होती, ती मुदत ८ जून रोजी संपली आहे.

गेल्या काही दिवसांपासून देशभरात दुचाकी अपघाताच्या घटना वाढत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर मुंबईच्या वाहतूक पोलिसांनी मागे बसणाऱ्यालाही हेल्मेटसक्ती केलीय. मागे बसणाऱ्याने हेल्मेट न घातल्यास ५०० रुपये दंड आणि तीन महिन्यांसाठी लायसन्स रद्दच्या शिक्षेची तरतूदही केलीय. पण आता या निर्णयामुळे दुचाकी चालकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. मुंबईच्या वाहतूक पोलिसांचा हा नियम जाचक असल्याचं अनेकांचं म्हणणं आहे. प्रत्येक वेळी मागच्याने हेल्मेट घालणे कितपत योग्य आहे, असा प्रश्न आता मोटारसायकल चालकांमधून उपस्थित केला जात आहे. मुंबईच्या वाहतूक पोलिसांनी ९ जूनपासून मागे बसणाऱ्यांनाही हेल्मेट सक्तीचे केले आहे. यासोबतच नियम मोडणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशाराही वाहतूक पोलिसांनी दिलाय. विशेष म्हणजे तत्पूर्वी हा नियम लागू करण्यासाठी १५ दिवसांची मुदतही दिली होती, ती मुदत ८ जून रोजी संपली आहे. त्यामुळे ९ जूनपासून मुंबईच्या वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम राबवली आहे.

आता बाईकच्या मागे बसणाऱ्याने हेल्मेट न घातल्यास वाहतूक अधिकारी कारवाई सुरू करतील. बहुतांश दुचाकीस्वार हेल्मेट घालत नाहीत आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करतात, असे वाहतूक पोलिसांना आढळून आले आहे. सध्या वाहतूक पोलीस हेल्मेट नसणाऱ्या दुचाकीस्वारांकडून ५०० रुपये दंड आकारतात किंवा त्यांचे परवाने निलंबित करतात. मात्र वाहतूक नियमांनुसार हेल्मेट न घालता दुचाकी चालवल्यास तुम्हाला दंडही होऊ शकतो हे ऐकून तुम्हाला आता धक्का बसला असेल.

# सर्वसामान्यांच्या घराची परवड थांबावी !

**गोरेगावमधील पहाडीसारख्या जागेचा अपवाद सोडल्यास म्हाडाकडे सध्याच्या घडीला मुंबई शहर वा उपनगरात एकाही ठिकाणी मोकळी जागा उपलब्ध नाहीय, त्यामुळे पुनर्विकास प्रकल्पांतूनच अधिकाधिक तयार घरं मिळवणं हा एकच पर्याय सध्या म्हाडासमोर शिल्लक आहे. म्हणूनच प्राधिकरणाने पुनर्विकास प्रकल्प विनाअडथळा कसे राबवता येतील याकडे गांभीर्याने बघण्याची गरज आहे. त्यांच्या कामाला गती देऊन ते लवकरात लवकर पूर्णत्वाला न्यायला हवेत, तेव्हा कुठे सर्वसामान्यांच्या घरांची परवड थांबू शकेल.**

मुंबईत आपलं स्वत:च्या हक्काचं घर असावं, बैठ्या चाळी किंवा जीर्ण इमारतीची वेस ओलांडून कधी ना कधी नव्या कोऱ्या घरात प्रवेश करावा असं स्वप्न प्रत्येक मुंबईकर उराशी बाळगून असतो. हे स्वप्न साकारण्यासाठी धकाधकीच्या या शहरात तो अव्याहत राबत असतो. परंतु मुंबईसह उपनगरातील जागेची टंचाई, अत्यंत मर्यादित संख्येने उभे राहणारे नवे गृहप्रकल्प आणि खासगी गृहप्रकल्पांतील कोटी कोटींची उड्डाणे घेणाऱ्या घरांच्या किमती ऐकून त्याचा हिरमोड झाल्यावाचून राहात नाही. गृहस्वप्न साकारण्यासाठी उत्सुक असणारे असे असंख्य मुंबईकर दरवर्षी एका गोष्टीची मात्र आतुरतेने वाट बघत असतात,



ती म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण अर्थात म्हाडाच्या लॉटरीची. गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांनी नुकतीच म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या लॉटरीची घोषणा केल्यामुळे सर्वसामान्यांमध्ये आनंदाची लाट पसरलीय.

गोरेगाव येथील पहाडी परिसरात म्हाडाच्या मुंबई मंडळाचा एक प्रकल्प आकारास येतोय. या प्रकल्पाला जितेंद्र आव्हाड यांनी भेट देऊन प्रगतीपथावर असलेल्या कामाची पाहणी केली. हे काम पूर्ण होऊन या सदनिका गृहखरेदीदारांना लवकरच वाटपासाठी खुल्या होतील, कदाचित दिवाळीपर्यंत; याची दाट शक्यता त्यांना वाटत असल्याने या प्रकल्पाला भेट देऊन आल्यानंतर त्यांनी लागलीच दिवाळीत ३ हजार घरांची सोडत निघेल, अशी घोषणा करून टाकली. या घोषणेमुळे सर्वसामान्य गृहखरेदीरांमध्ये नवी उमेद जागी झालीय. अनेकजण पैशांची जुळवाजुळव करण्याच्या तयारीलाही लागलेत. गृहमंत्र्यांच्या घोषणेनुसार सर्वकाही सुरळीत झालंच तर अनेकांची दिवाळी वा नवं वर्ष नव्या घराची चावी हाती घेऊनच साजरं होईल, असं म्हणायला हरकत नाही.

## ।। अभंगवाणी ।।



सांगतों तें तुम्हीं अइकावें कानीं ।
आमुचे नाचणीं नाचूं नका ॥१॥
जोंवरी या तुम्हां मागिलांची आस ।
तोंवरी उदास होऊं नका ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)




# मविआचा एल्गार..!

## ▸ छत्रपतींच्या अवमानाच्या निषेधार्थ हल्लाबोल मोर्चा ▸ राज्यपालांना हटविण्याची मागणी

। मुंबई । महाईन्यूज ।

राज्यपाल हटाव, महाराष्ट्र बचाव, छत्रपतींचा सन्मान हाच आमचा स्वाभीमान, शाहू, फुले, आंबेडकरांचा सन्मान हाच आमचा अभिमान अशा घोषणांनी शनिवारी अवघी मुंबई दणाणून गेली. निमित्त होते सरकारच्याविरोधात काढण्यात आलेल्या महाविकास आघाडीच्या हल्लाबोल मोर्चाचे. या मोर्चात भाजपविरोधी पक्षांनी एकजूट दाखवून एकीचे बळ दाखवून दिले.

या महामोर्चाला खा. शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख, माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, काँग्रेसचे



प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते अजित पवार, राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खा. संजय राऊत, माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील, माजी मंत्री आदित्य ठाकरे, भाई जगताप, खा.सुप्रिया सुळे, सपाचे प्रमुख अबू आझमी, खा.विनायक राऊत, खा.सुनिल तटकरे, माजी.खा.चंद्रकांत खैरे आदींसह महाविकास आघाडीचे घटक पक्षातील प्रमुख नेते उपस्थित होते. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना (ठाकरे), शेतकरी कामगार पक्षासह स्वाभिमानी पक्ष (राजू शेट्टी), समाजवादी पार्टी, आर.पी. आय.(सेक्युलर), बहुजन विकास आघाडी, जनता दल (धर्मनिरपेक्ष), मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी, लाल निशाण पक्ष, भा.क.प-मा.ले.(लिबरेशन), सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष अशा सर्व पक्ष संघटनांनी या मोर्चात आपला सहभाग नोंदवून सरकारविरोधात हल्लाबोल केला.

### "भाजपाचा खरा चेहरा समोर "

मागच्या आठवड्यात राज्यपाल पंतप्रधानांसोबत बसलेले आपण पाहिले. भाजपाचा खरा चेहरा समोर आला.अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. भाजपाचे प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी यांनी तर शिवाजी महाराजांनी औरंगजेबाची पाच वेळा माफी मागितली असं वक्तव्य केलं. त्यामुळे देशाच्या महापुरुषाचा अपमान करण्याचं धाडस भाजपानं केलं,असे पटोले यांनी सांगितले.

### महाराष्ट्राच्या बदनामीची स्पर्धा - पवार

मोर्चासमोर बोलताना शरद पवार यांनी या राज्यकर्त्यांमध्ये कर्तृत्वाची किंवा राज्याच्या विकासाची स्पर्धा नसून महाराष्ट्राच्या बदनामीची स्पर्धा सुरू झाली आहे.अशी टीका केली. एका मंत्र्याने उल्लेख केला की शिक्षणासाठी मदत मागितली तर त्याला भीक मागितली असं म्हणाले. तिथे महात्मा फुले, आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटलांचा उल्लेख केल्याबद्दलही त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. आज लोक शांत आहेत. राज्यपालांची हकालपट्टी वेळेत झाली नाही, तर हा महाराष्ट्र पेटून उठल्याशिवाय राहणार नाही. त्याचं प्रतीक आज इथे दिसतंय महात्मा फुलेंनी ज्ञानदानाच्या क्षेत्रात मोठं काम केलं. अशा व्यक्तीबाबत टिंगल-टवाळी राज्यपालांकडून होत असेल, तर राज्यपाल म्हणून त्यांना त्या पदावर राहण्याचा अधिकार नाही,असा इशाराही शरद पवारांनी आपल्या भाषणातून दिला. महाराष्ट्राच्या इतिहासात असा गव्हर्नर कधी पाहिला नाही. मी स्वत: राज्याच्या विधानभवनात जाऊन 55 वर्षं झाली. या काळात मी अनेक राज्यपाल पाहिले. महाराष्ट्राचा नावलौकिक वाढवण्याचं काम यांनी केलं. पण यावेळी राज्याच्या विचारधारेला संकटात आणण्याचं काम होत आहे. महात्मा फुले, सावित्रीबाईंबद्दल लाजिरवाणे उद्गार काढतात. त्यांना शरम वाटली पाहिजे,अशी टीकाही त्यांनी केली.

### यासाठी कायदा आणा - अजित पवार

राज्यपालांना हटवलं पाहिजे. दोषी असणाऱ्या आमदारांना हटवलं पाहिजे. त्यांनी माफी मागितली पाहिजे. अशी पुनरावृत्ती होणार नाही यासाठी पावलं उचलायला हवीत. त्यासाठी कायदा केला तरी चालेल, विरोधी पक्ष त्याला पाठिंबा देतील.अशी मागणी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी मोर्चासमोर बोलताना केली. माणसाची चूक एखाद्या वेळी होते. चूक झाल्यावर माफी मागणं ही आपली महाराष्ट्र संस्कृती आहे. मराठी माणसावर तसे संस्कार केले आहेत. पण तसं घडत नाही.

### महाराष्ट्र द्रोह्यांचे डोळे उघडणार -ठाकरे

मोर्चासमोर बोलताना शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी एवढी ताकद एकवटल्यानंतर कुणाची काय ब्याद आहे की मुंबईचा किंवा महाराष्ट्राचा लचका तोडणार.असा हल्लाबोल भाजपवर केला. या गर्दीमुळे महाराष्ट्रद्रोह्यांचे डोळे उघडले पाहिजेत. जर ते उघडणार नसतील, तर ते कधीच उघडू नयेत, अशी आपण प्रार्थना करुयात. जा, निघून जा इकडनं अशी मागणीही त्यांनी केली. मी तर त्यांना राज्यपालच मानत नाही. त्या पदाचा आम्ही नक्की मान राखतो. त्या पदावर कुणीही बसावं आणि कुणालाही टपल्या माराव्या हे आम्ही सहन करणार नाही. त्यामुळे राज्यपाल कोण असावा? फक्त केंद्रात जो बसतो, त्यांच्याघरी काम करणारा माणूस कुठेतरी सोय म्हणून पाठवायचा नसतो. राज्यपाल हे राष्ट्रपतींचे दूत असतात. त्यांनी त्यांच्यासारखं वागलं पाहिज,अशी अपेक्षाही उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली.

# हिंगोलीत अतिक्रमण हटाव मोहिमेला हिंसक वळण

## पोलिसांच्या वाहनावर दगडफेक; पालिका कर्मचाऱ्यासह पत्रकार जखमी

। हिंगोली । महाईन्यूज ।

शहरातील ऐतिहासिक जलेश्वर मंदिर तलाव परिसरातील १९५ अतिक्रमणधारकांचे बांधकाम काढण्याच्या शुक्रवारी सुरू झालेल्या मोहिमेला शनिवारी दुपारी अचानक हिंसक वळण लागले. काही अतिक्रमणधारकांनी केलेल्या दगडफेकीत पोलिसांच्या ११२ क्रमांकाच्या वाहनाची काच फुटली तर नगरपालिकेचा एक कर्मचारी व पत्रकारही जखमी झाले. जखमींना



तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून याची माहिती मिळताच पोलीस, महसूलचे प्रमुख अधिकारी आदी ताफ्यासह दाखल झाले. घटनास्थळी पोलिसांचे पथसंचलन करण्यात आल्याने परिसराला छावणीचे स्वरुप आले आहे.

दरम्यान, पोलिसांनी घटनेनंतर धरपकडची कारवाई सुरू केली आहे. जलेश्वर मंदिर तलाव परिसरात शुक्रवारी सुरू झालेल्या मोहिमेत जवळपास ७० ते ८० टक्के बांधकाम केलेल्या घरांचे अतिक्रमण जमीनदोस्त केले गेले. शनिवारी नगरपालिकेचे काही कर्मचारी त्या परिसरात दुपारी एक वाजता गेले असता अतिक्रमणधारकांनी अंबिका टॉकीज नजीक रस्ता रोको आंदोलन केले.दरम्यान, अतिक्रमणधारकांकडून दगडफेकही करण्यात आली. यामध्ये नगरपालिकेचे कर्मचारी पंडित मस्के व वार्तांकन करणारे पत्रकार ज्ञानेश्वर लोंढे जखमी झाले. त्यांना तात्काळ शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. दगडफेकीबाबतची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक जी. श्रीधर, अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, तहसीलदार नवनाथ वगवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी विवेकानंद वाखारे, महसूलचे उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी आदी अधिकारी संपूर्ण ताफ्यासह घटनास्थळी पोहोचले. रस्ता रोको करणाऱ्या सुमारे २० ते २५ महिला व एका पुरुषाला पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांकडून आता धरपकडची कारवाई सुरू आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक जी.श्रीधर यांच्या मार्गदर्शनाखाली त्या परिसरात पोलिसांचे पथसंचलन करण्यात आले. त्या परिसरात यावेळी चोख पोलीस बंदोबस्त लावल्याने आता त्या भागात तणावपूर्ण शांतता आहे.

# जीएसटी कौन्सिलचा मोठा निर्णय !

## खटला चालवण्याची मर्यादा 2 कोटी रुपयांपर्यंत वाढवली

**नवी दिल्लीत अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 48व्या बैठकीत जीएसटी परिषदेने (विशिष्ट गुन्ह्याचे गुन्हेगारीकरण करण्याची शिफारस केली आहे. यामध्ये आणखी एका महत्त्वाच्या निर्णय घेण्यात आला असून कौन्सिलने खटला चालवण्याची मर्यादा 1 कोटी रुपयांवरून 2 कोटी रुपयांपर्यंत दुप्पट केली आहे. यापुढे कराच्या सध्याच्या 50 ते 150 टक्क्यांच्या श्रेणीतील चक्रवाढ रक्कम 25 ते 100 टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला आहे.**

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. कौन्सिलने काही गुन्ह्यांना गुन्हेगारी ठरवण्याची शिफारस केली आहे आणि जीएसटी परिषदे (GST Council) अंतर्गत एक कोटी रुपयांवरून दोन कोटी रुपयांपर्यंत खटला चालवण्याची मर्यादा दुप्पट करण्याची मागणी केली आहे. नवी दिल्लीत अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 48व्या बैठकीत जीएसटी परिषदेने (विशिष्ट गुन्ह्याचे गुन्हेगारीकरण करण्याची शिफारस केली आहे.




यामध्ये आणखी एका महत्त्वाच्या निर्णय घेण्यात आला असून कौन्सिलने खटला चालवण्याची मर्यादा 1 कोटी रुपयांवरून 2 कोटी रुपयांपर्यंत दुप्पट केली आहे. यापुढे कराच्या सध्याच्या 50 ते 150 टक्क्यांच्या श्रेणीतील चक्रवाढ रक्कम 25 ते 100 टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला आहे.

वेळेच्या कमतरतेमुळे परिषद 15 पैकी केवळ आठ विषयांवर निर्णय घेऊ शकली, निर्मला सीतारामन (Nirmala Sitharaman) यांनी पत्रकारांना सांगितले की, जीएसटीसाठी अपिलीय न्यायाधिकरणाच्या स्थापनेशी संबंधित बाबींचा विचार केला गेला नाही. पान मसाला आणि गुटखा व्यवसायातील करचुकवेगिरीला आळा घालण्याच्या यंत्रणेचा मुद्दाही हाती घेता आला नाही. कोणतेही नवीन कर आणलेले नाहीत, असे सीतारामन यांनी नमूद केले. परंतू कौन्सिलने सध्या चिल्का आणि चुनी/चुरी, खंडा यासह कडधान्यांवर लागू होणारा पाच टक्के जीएसटी माफ करण्याचा निर्णय घेतला. कर दर शून्यावर आणला आहे. तसेच, "मोटार स्पिरिट (पेट्रोल) सह मिश्रित करण्यासाठी रिफायनरींना पुरवले जाणारे इथाइल अल्कोहोल" वरील जीएसटी (GST) दर 18 टक्क्यांवरून पाच टक्के करण्यात आला आहे.

याशिवाय 22 टक्के भरपाई उपकराचा उच्च दर कुठल्या वाहनांवर आकारला जातो त्याबाबतही जीएसटी कौन्सिलने स्पष्टीकरण दिलं.

पुढील चार अटी पूर्ण करणाऱ्या मोटार वाहनांना लागू आहे, म्हणजेच, जे SUV वाहन ओळखले जाते त्यात 1500 cc पेक्षा जास्त इंजिन क्षमता, 4000 mm पेक्षा जास्त लांबी आणि 170 mm किंवा त्याहून अधिक ग्राउंड क्लीयरन्स आहे त्यांनाच SUV आणि ऑटोमोबाईलच्या श्रेणींसाठी लागू होणारा कर लागू असल्याचं आपल्या प्रकाशनात म्हटले आहे. विशेष म्हणजे जीएसटी परिषद ही एक-राष्ट्र, एक-कर वस्तू आणि सेवा कर (GST) शासनाची सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था आहे. याचे नेतृत्व केंद्रीय अर्थमंत्री करतात आणि सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश या संस्थेचे प्रतिनिधित्व करतात.

# बिल्किस बानोची याचिका फेटाळली

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आधीच्या आदेशांचा फेरविचार करावा अशी मागणी करणारी पीडिता बिल्किस बानोची याचिका सर्वोच्च न्यायालयाने आज फेटाळून लावली. न्यायालयाने मे महिन्यामध्ये दिलेल्या आदेशांत गुजरात सरकारला सामूहिक बलात्कारप्रकरणातील दोषींच्या सुटकेसंबंधीच्या याचिकेवर विचार करण्यात यावे असे म्हटले होते. गुजरातमध्ये २००२ साली झालेल्या दंगलीदरम्यान बिल्किस बानोवर सामूहिक बलात्कार करण्यात आला होता तसेच तिच्या सात कुटुंबीयांची हत्याही करण्यात आली होती.



बिल्किस बानोची फेरविचार याचिका १३ डिसेंबर रोजी न्या. अजय रस्तोगी आणि न्या. विक्रम नाथ यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठासमोर सुनावणीसाठी आली होती. ही याचिका फेटाळून लावण्यात आल्याचे सर्वोच्च न्यायालयाकडून बानोच्या वकील शोभा गुप्ता यांना सांगण्यात आले. राज्य सरकारने ९ जुलै १९९२ रोजी निश्चित केलेल्या धोरणानुसार दोषींची मुदतपूर्वीच सुटका करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर विचार करावा, असे न्यायालयाने म्हटले होते. या दोषींच्या मुक्ततेबाबत दोन महिन्यांच्याआत निर्णय घेणे अपेक्षित होते. गुजरात सरकारने सामूहिक बलात्कार आणि खूनप्रकरणातील अकराही दोषींना १५ ऑगस्ट रोजी मुक्त केले होते. यावरून देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. न्यायालयाने दिलेल्या ताज्या आदेशाची प्रत अद्याप संकेतस्थळावर अपलोड व्हायची असल्याचे शोभा गुप्ता यांनी स्पष्ट केले. बिल्किस बानोची फेरविचार याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावल्यानंतर दिल्ली महिला आयोगाच्या अध्यक्षा स्वाती मालिवाल यांनी लोकांना सर्वोच्च न्यायालयाकडून न्याय मिळणार नसेल त्यांनी कोठे जायला हवे असा सवाल केला आहे.

# दूध उत्पादनाचा खर्च वाढला

## पशूखाद्याच्या किंमतीनं मागील 9 वर्षांचा विक्रम मोडला

।मुंबई। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

दुधाच्या उत्पादन खर्चात यावर्षी मोठी वाढ झाली आहे. दुधाळ जनावरांच्या चाऱ्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. चाऱ्याचे दर हे मागील 9 वर्षातील उच्चांकी पातळीवर पोहेचले आहेत. यावर्षी ऑगस्टमध्येच पशुखाद्याच्या महागाईनं मागच्या 9 वर्षांचा विक्रम मोडला आहे. ऑगस्टमध्ये या किंमती 25.54 टक्क्यांनी वाढल्या होत्या. परंतू नोव्हेंबरपर्यंत हा आकडा वाढला आहे. सध्या चाऱ्याच्या किंमतीत 27.66 टक्क्यांवर पोहोचल्या आहेत. जनावरांच्या चाऱ्याच्या दरात सातत्यानं



वाढ होत असल्यानं दुग्ध व्यवसाय करणाऱ्या पशुपालकांचा उत्पादन खर्च वाढला आहे.

चाऱ्याच्या दरात सतत होणारी वाढ ही पशुपालकांची चिंता वाढणारी आहे. यामुळं पशुपालन करणाऱ्या ग्रामीण कुटुंबांचा खर्च वाढला आहे. चांगल्या दुग्धोत्पादनासाठी जनावरांना चारा दिला जात नाही. जनावरांच्या आरोग्यासाठीही ते आवश्यक आहे. मात्र, गेल्या काही महिन्यातील वाढत्या महागाईमुळं पशुपालकांची चिंता वाढली आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं घाऊक किंमत निर्देशांक (WPI) ची आकडेवारी जाहीर केली आहे. यामध्ये नोव्हेंबरमध्ये पशुखाद्याचे निर्देशांक मूल्य 225.7 नोंदवले गेले आहे. मागील वर्षी हेच निर्देशांक मूल्य 176.8 नोंदवले गेले होते. या आकडेवारीनुसार वर्षभरात चाऱ्याची किंमतीत 28 टक्क्यांची वाढ झाली आहे. पशुखाद्याबरोबरच कुक्कुट खाद्याच्या किंमतीतही मोठी वाढ झाली आहे. डिसेंबर 2021 पासून पशुखाद्य आणि धान्याच्या किंमती वाढत आहेत. गेल्या 10 महिन्यांपासून या किंमती सातत्यानं वाढत आहेत .

# काँग्रेस चेंज नव्हे, तर एक्सचेंज होतेय : आपची टीका

।मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

मागील काही दिवसांपासून काँग्रेसची सातत्याने पिछेहाट होत आहे. मात्र आम आदमी पक्ष मजल दरमजल करत अनेक राज्यांमध्ये आपले पाय पसरत आहे. त्यातच आज पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी पंजाबमधील आपल्या सरकारच्या कामगिरीची माहिती देताना काँग्रेसवर कडाडून टीका केलीगुजरातमधील पराभवानंतर राहुल गांधी म्हणाले होते की, गुजरातेत आप आले नसते तर त्यांनी भाजपचा पराभव केला असता. यावर भगवंत मान म्हणाले की राहुल गांधी यांनी किती वेळा गुजरात दौरा केला आहे. पश्चिमेकडे निवडणूक असताना राहुल गांधी पुर्वेकडे पदयात्रा करत होते. त्यामुळे राहुल यांनी आधी त्यांच्या टायमिंगमध्ये सुधारणा करून घ्यावी.

भगवंत मान पुढे म्हणाले की, मध्य प्रदेशातील जनतेने काँग्रेसला निवडून दिले. पण आज तिथे भाजपची सत्ता आहे. कर्नाटकात कोणाचे सरकार होते? मात्र आज



भाजप सत्तेच्या खुर्चीवर बसले आहे. गुजरातमध्ये काँग्रेसने निवडणूक लढवलीच नाही. काँग्रेस हा आता चेंज नाही, तर एक्सचेंज पक्ष बनलाय. काँग्रेस कोमात गेली असून गरीब झाली आहे, त्यामुळे त्यांना आमदार विकून उदरनिर्वाह करावा लागत असल्याची जहरी टीका मान यांनी केली.

# सोनाली कुलकर्णीने शेअर केला राखी सावंतबरोबर घडलेला १५ वर्षांपूर्वीचा किस्सा

छोट्या पडद्यावरील अतिशय वादग्रस्त पण तितक्याच आवडीने पाहिला जाणारा शो म्हणजे ‘बिग बॉस’. सध्या ‘बिग बॉस मराठी’चं चौथं पर्व चर्चेत आहे. अभिनेता पुष्कर जोग व मराठमोळी अभिनेत्री सोनाली कुलकर्णीने ‘बिग बॉस’मध्ये पाहुणे कलाकार म्हणून हजेरी लावली आहे.

सोनाली व पुष्करने एन्ट्री केल्यानंतर ‘बिग बॉस’च्या घरातील सदस्यांची भेट घेतली. यावेळी सोनालीने एक जुना किस्सा शेअर केला. काही दिवसांपूर्वी वाइल्ड कार्डद्वारे ‘बिग बॉस’च्या घरात प्रवेश केलेली राखी सावंत मनोरंजनाचं परिपूर्ण पॅकेज आहे. राखी काही ना काही करुन प्रेक्षकांसह घरातील सदस्यांचं मनोरंजन करताना दिसते. याच राखी सावंतची आई चाहती असल्याचं सोनाली कुलकर्णीने सांगितलं.सोनाली म्हणाली, “माझी आई राखी सावंतची खूप मोठी चाहती आहे. १५ वर्षांपूर्वी घडलेली ही गोष्ट आहे. मी व आई एकदा मॉलमध्ये गेलो होतो. तिथे तिने राखीला पाहिलं आणि आई राखीचं नाव घेत जोरात ओरडली. माझ्या आईने तेव्हा राखीबरोबर फोटोही काढला होता. तो फोटो आजही माझ्याकडे आहे”. राखी सहभागी झालेली ‘बिग बॉस’चे पर्वही सोनालीने पाहिले असल्याचं तिने सांगितलं. शिवाय राखीला सोशल मीडियावर फॉलो करत असल्याचंही ती म्हणाली.

“राखी सावंतकडे काय आहे ते मला माहीत नाही. पण सगळ्यांचं मनोरंजन करण्याचा ती पूरेपूर प्रयत्न करते. आणि यात ती यशस्वीही होते”, असंही पुढे सोनाली राखीचं कौतुक करत म्हणाली. ‘बिग बॉस’च्या घरातून बाहेर पडल्यानंतर सोनालीच्या आईला नक्की भेटणार असल्याचं राखी म्हणाली.



# नजरा नजर झाली.. ठसन दिली.. पण झालं उलटच.. रितेश जेनेलियाची पहिली भेट

बॉलिवूड अभिनेता रितेश देशमुख हा हिंदीच नाही तर मराठी चित्रपटातील लोकप्रिय अभिनेता आहे. आज रितेश देशमुखची ओळख आज एक लोकप्रिय अभिनेता असलं तरी त्यांची फिल्म इंडस्ट्रीत येण्याआधी त्याची ओळख ही वेगळी होती. त्याचे वडिल विलासराव देशमूख हे महाराष्ट्राचे मुख्यंमत्री असल्याने त्याला सर्वजण मुख्यमंत्र्यांचा मुलगा म्हणूनच ओळखच होते. यामूळे अनेकांचं त्याच्या विषयी अनेक मत होते. त्यातच त्याची पत्नी जेनिलिया हिचंही रितेश बद्दल असंच वेगळं काही तरी मत होत. एक मुख्यमंत्र्यांचा मुलगा तर खूप गर्विष्ठ असणार अस मत जेनिलिया देशमुख होत. रितेश देशमुख आज त्याचा ४४ वा वाढदिवस साजरा करत आहे.

सर्वसामान्य घरातून आलेली जेनेलिया आणि राजकारणी घरातुन आलेला रितेश देशमुख यांची पहिली ओळख हैदराबाद एअरपोर्ट झाली तेव्हा जेनेलियाला वाटले रितेश देशमुख खुप घमंडी आहे. तो एक राजकारणी घरातुन आला आहे तर खुप आगाऊ असेल. पण नंतर जेव्हा ते एकमेंकाना चांगले ओळखू लागले तेव्हा या दोघांमध्ये चांगली मैत्री झाली. त्याच्यासोबत वेळ घालवल्यानंतर तिचं रितेश बदल मत वेगळं झालं.एका शोमध्ये जेनेलियाने सांगितले होते रितेश बरोबर पहिल्यांदा मी मोठ्या अंहकारी आवाजात बोलले पण तेव्हा रितेश खुप सौम्य आवाजात बोलला तेव्हा माझं मत बदललं. रितेश आणि जेनेलियाने त्यांच्यात चालेलं प्रेमाचं नातं त्यांनी कोणालाच बरेच दिवस सांगितलं नव्हते सरळ लग्नाच निमंत्रण देतचं त्यांनी सर्वांना याबद्दल सांगितलं. दरम्यान, रितेश आणि जेनेलिया एकमेकांच्या जवळ आले आणि 10 वर्षे डेट केल्यानंतर दोघांनी 3 फेब्रुवारी 2012 रोजी लग्न केले. रितेश आणि जेनेलियामध्ये ९ वर्षांचा फरक आहे.



# ‘एका लग्नाची पुढची गोष्ट’ला फालतू आणि दर्जाहीन म्हणणाऱ्याला प्रशांत दामलेंचं सडेतोड उत्तर,



‘एका लग्नाची पुढची गोष्ट’ला फालतू आणि दर्जाहीन म्हणणाऱ्याला प्रशांत दामलेंचं सडेतोड उत्तर, म्हणाले...

अभिनेते प्रशांत दामले हे गेल्या अनेक वर्षांपासून मराठी नाट्यसृष्टीमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी अनेक लोकप्रिय नाटकांमध्ये महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा साकारल्या आहेत. त्यांच्या अभिनयाचे लाखो चाहते आहेत. काही दिवसांपूर्वीच त्यांनी त्यांच्या कारकीर्दीमधला १२ हजार ५००वा नाट्यप्रयोग सादर केला. प्रशांत दामले नाट्यसृष्टीत जितके सक्रीय असतात तितकेच सक्रिय ते सोशल मीडियावरदेखील असतात. सोशल मीडियावरून ते नेहमी चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करत असतात. पण आता नुकतंच त्यांच्या ‘एका लग्नाची पुढची गोष्ट’ नाटकाला दर्जाहीन म्हणणाऱ्याला त्यांनी त्यांच्या शैलीत सडेतोड उत्तर दिलं आहे.

सोशल मीडियावर सक्रिय राहून ते नाटकांच्या प्रयोगादरम्यान आलेले अनुभव चाहात्यांची शेअर करत असतात. काही दिवसांपूर्वीच ते त्यांच्या ‘एका लग्नाची पुढची गोष्ट’ या नाटकाच्या प्रयोगासाठी संभाजीनगर येथे गेले होते. प्रवासादरम्यानचा एक व्हिडीओ पोस्ट करत त्यांनी तेथील रस्त्याची अवस्था कशी आहे हे चाहत्यांची शेअर केलं होतं. त्याची बातमी एका न्यूज पोर्टलने केली आणि त्या बातमीवर नेटकऱ्यांनी विविध प्रतिक्रिया दिल्या.या बातमीवर कमेंट करत एका नेटकऱ्याने लिहिलं “मुळात हे पुढची गोष्ट नाटकच अतिशय फालतू आणि दर्जाहीन आहे. त्या गोष्टीत काहीही जीव नाही.” नेटकऱ्याच्या या कमेंटवर प्रशांत दामले यांनीही त्यांच्या स्टाईलने सडेतोड उत्तर दिलं आहे. त्यांनी लिहिलं, “बरं... त्याच नाटकाचे ५४७ प्रयोग झाले आहेत. प्रत्येकाचा दृष्टिकोन असतो की.” त्यांच्या या उत्तराने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. दरम्यान प्रशांत दामले यांची ‘एका लग्नाची पुढची गोष्ट’ आणि ‘सारखं काहीतरी होतंय’ ही दोन नाटकं रंगभूमीवर सुरु आहेत. या दोन्ही नाटकांना उत्कृष्ट प्रतिसाद मिळतोय.



# ब्रेक घेण्याचा चॉइस माझा” – काजोल

माझ्या प्रत्यक्ष जीवनात आणि करिअरमध्येही मातृत्वाला अनन्यसाधारण महत्त्व आहे...

अभिनेत्री काजोल

मी जशी घडले त्यामागे माझी आई अभिनेत्री तनुजा, माझी आजी शोभना समर्थ यांची मूल्यं, या दोघींचे पालनपोषण होते. माझी जडणघडण, माझी विचारसरणी यावर आई आणि आजी यांचा प्रभाव असूनही माझे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घडले, याचं श्रेयदेखील या दोघींचं. आजी-शोभना समर्थ, आई तनुजा आणि आजीची आई रतनबाई शिलोत्री या सगळ्या कर्तृत्ववान, स्वतंत्र बाण्याच्या, स्वावलंबी, खंबीर स्त्रिया, आजच्या भाषेत सांगायचं झाल्यास ‘करिअरस्टिक वूमन’. मी लहान असताना आजी, आईला नेहमीच काम करताना पाहिलंय, आईने रुपेरी पडद्यावर प्रथम काम केलं तेव्हा तिचं वय फक्त ७ होतं. आई गे ल ी ७३ वर्षं सतत काम करतेय! माझ्यावर त्यांचा प्रभाव न पडल्यास नवल होतं. अभिनय हा रक्तात भिनलेला व्यवसाय असल्यानं मी अभिनयाकडे आकृष्ट झाले हे स्वाभाविकच होतं त्यामुळे आईने मला उच्च शिक्षणासाठी विदेशात पाठवलं तरी मी अभिनयाच्या ओढीने भारतात परतले. विवाहानंतर, विशेषतः मातृत्वानंतर मी करिअरमधून ‘ब्रेक’घेतला. अभिनय करणं ही कधीही आर्थिक निकड नव्हती. अभिनय ही

# मोरोक्कोवर 2-1ने विजय!

## कांस्यपदक जिंकत क्रोएशिया ठरला 2 कोटी 70 लाखांचा मानकरी

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था




विश्वविजेतेपदाचे स्वप्न अधुरे राहिले असले, तरी शनिवारी झालेल्या तिसऱ्या स्थानासाठीची लढतीत क्रोएशियाने मोरोक्कोवर २-१ ने विजय मिळवत फिफा विश्वचषक २०२२ मधील कांस्यपदकावर नाव कोरले. शेवटचा सामना जिंकून विश्वचषक फुटबॉल स्पर्धेची विजयी सांगता क्रोएशियाने केली. क्रोएशियाचा कर्णधार आणि तारांकित मध्यरक्षक लुका मॉड्रिचचा हा विश्वचषकातील अखेरचा सामना होता कारण तो आता निवृत्ती घेणार असे स्पष्ट संकेत त्याने दिले आहे. तो सध्या ३७ वर्षांचा आहे.

क्रोएशियन संघाने २०२२ च्या फिफा विश्वचषक स्पर्धेचे आयोजन कतारमध्ये केले आहे. तिसऱ्या क्रमांकासाठी खेळल्या गेलेल्या सामन्यात क्रोएशियाने मोरक्कन संघाचा २-१ असा पराभव केला. गेल्या विश्वचषकात क्रोएशिया उपविजेता ठरला होता. यावेळी त्याला उपांत्य फेरीत लिओनेल मेस्सीच्या अर्जेंटिना संघाकडून ३-० ने पराभूत केले. दुसरीकडे, मोरोक्कन संघ उपांत्य फेरीत पोहोचणारा पहिला आफ्रिकन संघ आहे. त्याचा उपांत्य फेरीत फ्रान्सकडून पराभव झाला होता. आता तिसऱ्या सामन्यातही त्याला क्रोएशियाकडून दारूण पराभवाला सामोरे जावे लागले. अशाप्रकारे चौथ्या क्रमांकावर राहून मोरक्कन संघाने आपला प्रवास संपवला आहे. क्रोएशिया आणि मोरोक्कोचे संघ अंतिम फेरीत पोहोचू शकले नसले तरी उपांत्य फेरी गाठण्यासाठी त्यांना कोट्यवधी रुपये बक्षीस म्हणून मिळणार आहेत. या सामन्यातील विजयी संघ क्रोएशियाला तिसऱ्या क्रमांकावर राहण्यासाठी सुमारे २.७० कोटी रुपयांचे बक्षीस मिळणार आहे. दुसरीकडे, पराभूत मोरक्कन संघ चौथ्या क्रमांकावर आहे, त्यानंतर त्याला सुमारे २.०६ कोटी रुपये दिले जातील. याशिवाय फिफा विश्वचषक अंतिम सामन्यातील विजेत्या संघाला ३५० कोटी रुपये आणि उपविजेत्या संघाला २५० कोटी रुपये देण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे फिफा विश्वचषकाचा अंतिम सामना लिओनेल मेस्सीच्या नेतृत्वाखाली गतविजेता फ्रान्स आणि अर्जेंटिना यांच्यात होणार आहे. हा सामना रविवारी (१८ डिसेंबर) होणार आहे.सामन्याच्या पूर्वार्धात गतवर्षीच्या उपविजेत्या क्रोएशियाने आपला आक्रमक खेळ दाखवत आपले वर्चस्व कायम राखले. क्रोएशियन संघाने सामन्याच्या पूर्वार्धात दोन गोल करत २-१ अशी आघाडी घेतली. दोन्ही गोल जोस्को गार्डिओल आणि मिस्लाव ओसेक यांनी केले. पूर्वार्धात क्रोएशियाने गोलचे ८ प्रयत्न केले, तर लक्ष्यावर ४ शॉट्स लागले. यामध्ये दोन गोल होते. तर मोरोक्कन संघाने पूर्वार्धात केवळ ४ वेळा गोलसाठी प्रयत्न केले. यादरम्यान त्याच्या निशाण्यावर एकच शॉट लागला. पूर्वार्धात क्रोएशियानेही मोरक्कन संघाचा उत्कृष्ट बचाव उद्ध्वस्त केला. चेंडूचा ताबा क्रोएशियाकडे ६० टक्के आणि मोरोक्कोकडे फक्त ४० टक्के होता.

# ब्राझीलच्या नेमारचे थेट भारत कनेक्शन!

नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



ब्राझीलचा फुटबॉल स्टार नेमारने आपल्या संघाला पाठिंबा दिल्याबद्दल भारतीय चाहत्यांचे आभार मानले आहेत. त्यांनी विशेषत: केरळच्या चाहत्यांचे समर्थन केल्याबद्दल आभार मानले. फिफा विश्वचषक स्पर्धेत ब्राझीलचा संघ उपांत्यपूर्व फेरीत क्रोएशियाकडून पराभूत होऊन बाहेर पडला. विश्वचषक जिंकण्यासाठी ब्राझीलला फेव्हरिट मानले जात होते.

खरंच, विश्वचषकादरम्यान केरळमध्ये चाहत्यांनी आपल्या आवडत्या संघांना पाठिंबा व्यक्त करण्यासाठी सजावटीसह रस्त्यावर उतरणे हे एक सामान्य दृश्य आहे, परंतु यावेळी त्यांच्या तयारीचे जगभरातून कौतुक होत आहे. राज्याच्या पुलावूर नदीवर नेमार, अर्जेंटिनाचा लिओनेल मेस्सी आणि पोर्तुगालचा क्रिस्टियानो रोनाल्डो यांच्या विशाल कट-आउट्सचेही फिफाने कौतुक केले.

केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनी केरळचे फुटबॉलबद्दलचे प्रेम आणि अतुलनीय उत्कटतेची कबुली दिल्याबद्दल फिफाचे आभार मानले. विजयन यांनी आपल्या ट्विटमध्ये लिहिले, “केरळ आणि केरळच्या लोकांना फुटबॉल नेहमीच आवडतो. खेळाबद्दलची आमची अतुलनीय आवड ओळखल्याबद्दल फिफाचे आभार. फुटबॉलवरील प्रेम आम्ही कधीच कमी होऊ देणार नाही.

# बांगलादेशला हरवत भारताने तिसऱ्यांदा जिंकला टी-20

नाशिक ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

भारतीय संघाने शनिवारी (१७ डिसेंबर) अंधांच्या टी२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत बांगलादेशचा पराभव करून विजेतेपद पटकावले आहे. त्याने सलग दोनवेळा स्पर्धेची अंतिम फेरी जिंकली आहे. टीम इंडियाने हा सामना १२० धावांनी जिंकला. प्रथम फलंदाजी करताना त्यांनी दोन गडी बाद २७७ धावा केल्या. प्रत्युत्तरात बांगलादेशचा संघ २० षटकांत ३ गडी गमावून १५७ धावाच करू शकला.

भारतीय संघाने यापूर्वी २०१२ आणि २०१७ मध्येही ही स्पर्धा जिंकली होती. या सामन्यात टीम इंडियाला दोन शतके लागली. सुनील रमेशने ६३ चेंडूत १३६ धावांची खेळी केली. त्याचवेळी कर्णधार अजय रेड्डीने ५० चेंडूत १०० धावा केल्या. बांगलादेशबद्दल बोलायचे झाले

### 6 संघांमध्ये नंबर 1 टीम इंडिया

५ डिसेंबरपासून ६ देशांदरम्यान सुरू झालेल्या या स्पर्धेत भारतीय संघाने सुरुवातीपासूनच वर्चस्व राखले. टीम इंडियाने साखळी फेरीतील सामन्यांमध्ये पहिले स्थान मिळवून उपांत्य फेरीत धडक मारली. उपांत्य फेरीत भारताने दक्षिण आफ्रिकेचा २०७ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. त्याचवेळी बांगलादेशने दुसऱ्या उपांत्य फेरीत श्रीलंकेचा पराभव केला.

### विजयाची हॅट्ट्रिक पूर्ण केली

या विश्वचषकाच्या तिन्ही आवृत्त्यांमध्ये भारताने विजेतेपद पटकावले आहे. २०१२ मध्ये प्रथमच या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आणि त्यात भारताने विजेतेपद पटकावले. त्यानंतर २०१७ मध्ये झालेल्या दुसऱ्या स्पर्धेत, टीम इंडिया बेंगळुरूमध्ये खेळल्या गेलेल्या फायनलमध्ये चॅम्पियन बनली. त्यानंतर भारताने पाकिस्तानला हरवून विजेतेपद पटकावले. आता २०२२ मध्ये भारताने या स्पर्धेत आपली हॅट्ट्रिकही पूर्ण केली आहे.



# बांगलादेशला मोठा धक्का!

## दुसऱ्या कसोटीतून कर्णधार अन् घातक गोलंदाज बाहेर...

।बांगलादेश ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था




आजकाल अनेक संघ खेळाडूंच्या दुखापतीमुळे त्रस्त आहेत. आता असेच काहीसे भारताविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेत बांगलादेश संघात पाहायला मिळाले आहे. कारण बांगलादेशचा कर्णधार शकीब अल हसन आणि वेगवान गोलंदाज इबादत हुसेन दुखापतीमुळे मीरपूर कसोटीतून बाहेर झाले आहेत. आता अशा स्थितीत यजमान बांगलादेशला दुसऱ्या कसोटीत अनेक मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

विशेष म्हणजे चट्टोग्राम येथे खेळल्या जात असलेल्या पहिल्या कसोटीच्या दुसऱ्या डावात दोन्ही स्टार खेळाडू जखमी झाले. त्यामुळे त्याने एकही षटक टाकले नाही. पहिल्या कसोटी सामन्यात शकीब अल हसन केवळ 12 षटके टाकली. त्याला एकदिवसीय मालिकेदरम्यान दुसऱ्या सामन्यात उमरान मलिकने दुखावल्यानंतर बरगडी आणि खांद्याचा त्रास होत असतानाही तो पहिल्या कसोटीत दिसला. क्रिकबझच्या मते, स्टार अष्टपैलू खेळाडू शकीब अल हसन पहिल्या कसोटीत खेळण्यास संकोच करत होता पण शेवटी त्याने खेळण्याचा निर्णय घेतला.

भारतीय संघ -

केएल राहुल (कर्णधार), शुभमन गिल, चेतेश्वर पुजारा, विराट कोहली, श्रेयस अय्यर, रिषभ पंत, आर. अश्विन, अक्षर पटेल, उमेश यादव, नवदीप सैनी, जयदेव उनाडकट, मोहम्मद सिराज, सौरभ कुमार, कोना भारत, कुलदीप यादव, अभिमन्यू ईश्वरन

बांगलादेश संघ -

शकिब अल हसन (कर्णधार), लिटन दास, मुशफिकर रहिम, मोईनुल हक, मेहदी हसन, मोहम्मदूल हसन, अनामुल हक, खलीद अहमद, एबादोत हुसैन, शोफिफुल इस्लाम, तस्किन अहमद, तैजुल इस्लाम, नजमुल हुसैन, रेजुल रेहमान, झाकिर हसन, नुरुल हसन आणि यासीर अली.